गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ९ वा | शुक्रवार २६ मे २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 09 | Date : 26/05/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

# राज्यात प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी प्रयत्नशील : ना.देवेंद्र फडणवीस

## महापालिका आणि सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या प्रकल्पांचे लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधी : राज्यात प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे यासाठी शासन प्रयत्नशील असून १० लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मारक मंदिर येथे महापालिका व सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या प्रकल्पांच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजीतसिंह मोहिते पाटील, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, शहाजी पाटील, राम सातपुते, माजी महापौर कांचन येनम, प्रभारी जिल्हाधिकारी व प्रभारी आयुक्त तुषार ठोंबरे, मुख्य कार्यकारी अधिकारी




दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, महापालिका आयुक्त शीतल तेली उगले (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे आदी उपस्थित होते.

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या चार सुंदर प्रकल्पांचे लोकार्पण होत असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यात 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून प्रशासन सामान्यांपर्यंत पोहोचत आहे. पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ दिला जात आहे. दोन महिन्यांमध्ये जिल्ह्यातील दीड लाख नागरिकांना शासन आपल्या दारी या अभियानातून विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. शासन स्तरावर सर्व सामान्यांच्या हिताचे निर्णय तातडीने घेतले जात आहेत. शासनाने महिलांसाठी विविध योजना सुरू केल्या असून यामध्ये 'लेक लाडकी', एसटी प्रवासात ५० टक्के सवलत योजना सुरू केली आहे. शेतकऱ्यांना एक रुपयात विमा योजना, कृषि सौर वाहिनी योजना, बेरोजगारांना काम मिळावे यासाठी तालुका स्तरावर रोजगार मेळाव्याचेआयोजन करण्यात येत आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवणाऱ्या संकल्पनांना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी पाठिंबा देण्यात येईल. झोपडपट्टी भागात प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून पक्की घरे पुरवण्यात यावीत, असे ही त्यांनी सांगितले.

**उजनी विस्तारित योजनेसाठी निधी**

सोलापूर शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा महत्वाचा असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, उजनी समांतर जल वाहिनी ही योजना मार्गी लावली असून या योजनेचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल. ही योजना | **पान २ वर**

# राज्याचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के, पुन्हा कोकण विभाग अव्वल



पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत २.९७ टक्क्यांनी घटला. राज्याचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के लागला. निकाल घटण्याबरोबरच राज्यातील गुणवंतही घटले आहेत असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी २ हजार ३५१ ने कमी झाले आहेत. राज्यात कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९६.१ टक्के, तर मुंबई विभागाचा निकाल सर्वात कमी ८८.१३ टक्के लागला.

यंदा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेण्यात आली. २०२१मध्ये अंतर्गत मूल्यमापनाद्वारे निकाल ९९.६३ टक्के लागला होता. तर गेल्या वर्षीच्या | **पान २ वर**

## बारावीत सोलापूर जिल्ह्याच्या निकाल ९३.६८ टक्के

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल गुरूवारी जाहीर झाला असून त्यात सोलापूर जिल्ह्याच्या निकाल ९३.६८ टक्के लागला आहे. यंदाही मुलींनी मुलांना मागे टाकत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सोलापूर जिल्ह्यात ५३ हजार २५७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यात ३० हजार ५३८ मुले तर २२ हजार ७१९ मुलींचा समावेश होता. त्यातील ३० हजार २१३ मुलांनी तर २२ हजार ५२९ मुलींनी परीक्षा दिली. त्यात २८ हजार ०४२ मुले तर २१ हजार ८५० मुली उत्तीर्ण झाल्या. परीक्षेला बसलेल्या एकूण ५२ हजार ७४२ पैकी ४९ हजार ८९२ मुले-मुली उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्यात मुलांची टक्केवारी ९१.८२ तर मुलींची ९६.१७ टक्के इतकी आहे. एकूण निकाल ९३.६८ टक्के इतका लागला.

# राज्यसभेत अध्यादेशाविरोधात विरोधकांनी मतदान करावं; पवारांच्या भेटीनंतर केजरीवालांचे आवाहन

मुंबई : केंद्र सरकार आणलेला अध्यादेश हा फक्त दिल्लीतील लोकांविरोधात नाही. तर, देशाच्या संघराज्य प्रणालीवर केलेला आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या घटनाविरोधी अध्यादेशाविरोधात राज्यसभेत विरोधकांनी मतदान करावे असे आवाहन दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी



पत्रकार परिषदेत आवाहन केले. यावेळी आम्ही केजरीवाल यांच्या पाठीशी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले.

सुप्रीम कोर्टाने दिल्ली सरकारला त्यांच्या अखत्यारीत असलेल्या खात्यांच्या अधिकाऱ्यांची बदली करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले होते. सुप्रीम कोर्टाने हा निकाल दिल्यानंतर काही दिवसातच केंद्र सरकारने दिल्ली सरकारचे अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार गोठवणारा अध्यादेश जारी केला. त्यानंतर आता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांची भेट घेण्यास सुरुवात केली आहे. त्याच अनुषंगाने केजरीवाल मागील दोन दिवस मुंबईत आहेत. बुधवारी त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. तर, आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. 'आप'कडून केजरीवाल यांच्यासह पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, खासदार संजय सिंह, राघव चड्ढा उपस्थित होते. तर, राष्ट्रवादीकडून | **पान २ वर**

# नव्या संसदेचं उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यासाठी सुप्रीम कोर्टातील दाखल याचिकेवर आज सुनावणी

नवी दिल्ली : नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींनी करावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर आज (२६ मे) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या याचिकेची सुनावणी न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि पी.एस. नरसिम्हा यांच्या सुट्टीतील खंडपीठासमोर होईल. सी.आर. जयसुकिन नावाच्या वकिलाने ही याचिका दाखल केली आहे. दाखल केलेल्या या याचिकेमध्ये कलम ८५ नुसार राष्ट्रपती या संसदेचं सत्र बोलवतात. तसेच ८७ नुसार त्याचं संसदेत अभिभाषण देखील होतं. ज्यामध्ये राष्ट्रपती दोन्ही सदनांना संबोधित करतात. तसेच संसदेमधील सगळी विधेयकं ही राष्ट्रपतींच्या मंजुरीनेच कायदेशीर केली जातात. त्यामुळे राष्ट्रपतींच्या हस्ते या नव्या संसद भवनाचं उद्घाटन करण्यात यावं. दुसरीकडे, २१ विरोधी पक्षांच्या बहिष्काराच्या दरम्यान २८ मे रोजी होणाऱ्या नवीन संसद भवनाच्या उद्घाटन समारंभात २४ राजकीय पक्ष सहभागी होणार आहेत. लोकसभा सचिवालयानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करणार आहेत. उद्घाटन समारंभात सहभागी होणार्या पक्षांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी मध्ये समाविष्ट असलेल्या १८ पक्षांची आणि NDA चा भाग नसलेल्या सहा पक्षांची नावे आहेत.

संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन समारंभात सहभागी होणाऱ्या 18 NDA पक्षांमध्ये भाजप, शिवसेना-शिंदे, नॅशनल पीपल्स पार्टी ऑफ मेघालय, राष्ट्रवादी डेमोक्रेटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी, सिक्कीम क्रांतीकारी मोर्चा, जन-नायक पार्टी, AIADMK, IMKMK, -गडण यांचा समावेश आहे. , RPI, मिझो नॅशनल फ्रंट, तमिळ मानिला काँग्रेस, ITFT (त्रिपुरा), बोडो पीपल्स पार्टी, पट्टाली मक्कल काची, महाराष्ट्रवादी गोमंतक पार्टी, अपना दल आणि आसाम गण परिषद.

# राज्य सरकारचा मोठा निर्णय! झोपडपट्टीवासियांना मिळणार अडीच लाखात घर

मुंबई : राज्य सरकारने आज मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने एक जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ या काळातील झोपडीधारकांना मोठा दिलासा दिला आहे. मुंबईतील झोपडीच्या बदल्यात झोपडीधारकांना सशुल्क घर मिळणार आहे. या निर्णयामुळे लाखो झोपडीधारकांना फायदा होणार



आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहनिर्माण खात्याची जबाबदारी आहे. त्यांच्या अखत्यारीत असलेल्या विभागाने हा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने याबाबत परिपत्रक जाहीर केले आहे. या परिपत्रकानुसार, मुंबईत झोपडीच्या बदल्यात सशुल्क घर मिळणार आहे. झोपडीच्या बदल्यात अवघ्या दोन लाख ५० हजार रुपयांत घर मिळणार आहे. शासनाकडून पुनर्वसन सदनिकेची किंमत अडीच लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. शासन निर्णय जारी झाल्याने लाखो झोपडपट्टीवासियांच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. त्याशिवाय या निर्णयामुळे झोपडपट्टी असलेल्या जागांचा विकास होणार आहे. राज्य जारी केलेल्या निर्णयानुसार, या नव्या योजनेतील लाभार्थी झोपडपट्टीवासियांच्या अटी आणि शर्थी निश्चित करण्यासाठीची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आली आहे. आगामी काही महिन्यात मुंबई महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका आणि राज्यातील इतर महत्त्वाच्या महापालिकांच्या निवडणूक लक्षात घेता, राज्य सरकारकडून सातत्याने मुंबई, पुणे, ठाणे सारख्या महत्त्वाच्या महापालिकांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. मुंबईतील १ जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ या कालावधीतील झोपडपट्टीधारकांना आता अडीच लाखात घरं देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.या निर्णयाचा फायदा लाखो झोपडपट्टीवासियांना होणार आहे. मुंबईत अडीच लाखात हक्काचे घरं देण्याचा निर्णय मोठा गेमचेंजर ठरू शकतो.

# गजानन महाराजांच्या पालखीचं आज पंढरपूरकडे प्रस्थान; शेगाव नगरी सजली

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील शेगावनगरीत उत्साहाचे टाळ वाजतायत आणि मृदुंगातून सात्विकता पाझरू लागली हे. बच्चा कंपनीपासून वृद्धांपर्यंत सगळ्यांनाच राम कृष्ण हरी या मंत्राने भुरळ घातली आहे. कारण आहे गजानन महाराजांच्या पालखी प्रस्थानाचं. आज संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. यासाठी संस्थानातर्फे जय्यत



तयारी करण्यात आली आहे.डोईवर तुळशी वृंदावन घेतलेल्या विठोबाच्या लेकी, डोक्यावर शुभ्र टोपी, हाती वैष्णवाची पताका, गळ्यात टाळ, कपाळी अबीर आणि चंदनाचा टिळा लावलेले ज्ञानोबा-तुकोबांचे पाईक आणि मुखी विठ्ठलाचे नाम... असं सगळं विठ्ठलमय वातावरण ठायी ठायी दिसणार आहे. सर्व वारकऱ्यांमध्ये एक उत्साहाचं वातावरण दिसून येत आहे.

आजपासून गजानन महाराजांची पालखी पंढरपूरच्या दिशेने मजल-दरमजल करत पुढे पुढे सरकत राहणार आहे. गजानन महाराजांच्या पालखीचं यंदा ५४ वं वर्ष | **पान २ वर**

## 'हरित वारी स्वच्छ वारी' संकल्पनेवर आषाढी वारीचे नियोजन

# महिला वारकऱ्यांना मूलभूत,आरोग्य सुविधा पुरविणार : दिलीप स्वामी

पंढरपूर/प्रतिनिधी:'हरित वारी, स्वच्छ वारी' या संकल्पनेवर आधारित पर्यावरण संवर्धनाचा जागर आषाढी वारीमध्ये होणार आहे. गतवर्षी दहा हजार वृक्ष लागवड पालखी मार्गावर प्रशासनाकडून करण्यात आली होती. यंदा अधिकची वृक्ष लागवड करून प्लास्टिक संकलन केंद्रे उभा करण्यात येणार आहेत. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या महिला वारकऱ्यांना मूलभूत व आरोग्य विषयक सुविधांसह हिरकणी कक्ष उपलब्ध करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सांगितले.आषाढी वारी नियोजनाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे, निवासी उपल्हिाधिकारी शमा पवार, उपविभागीय अधिकारी गजानन गुरव आणि नामदेव टिळेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे आणि सुनिल वाळूंजकर, तहसीलदार सुशिल बेल्हेकर, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, मंदिर समितीचे



सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, कबीर महाराज, राणा महाराज वासकर, विश्वस्त, फडकरी, दिंडींकरी, नागरिक, व्यापारी तसेच संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, महिला भाविकांच्या आरोग्य विषयक बाबी, स्वच्छता तसेच सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासाठी संबंधित ठिकाणी महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा देण्यात येणार आहेत. आषाढी वारी सोहळ्यास येणाऱ्या सर्व भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. यामध्ये पिण्याचे पाणी, शौचालये, अखंडित वीज पुरवठा, सुरक्षा या बाबींना प्राधान्य द्यावे. पालखी मुक्कामाची व विसावा तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची कामे करण्याबरोबरच पालखी विश्वस्तांनी सुचविलेली कामे प्राधान्याने व वेळेत पूर्ण करावीत. पालखी मार्गावर भाविकांना मुबलक व स्वच्छ पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी पाण्याचे स्त्रोत शुध्दीकरणाबाबत नियोजन करावे. नगरपालिकेने चंद्रभागा वाळवंट व नदीपात्र स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. पालखी मार्गावर उपलब्ध सुविधेबाबत दिशदर्शक फलक लावावेत, अशा सूचनाही श्री. स्वामी यांनी यावेळी दिल्या. ।

जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत | **पान २ वर**

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### पुन्हा धक्काच...

मोदी सरकार कुठल्या ना कुठल्या कारणाने सर्वसामान्यांसह श्रीमंत वर्गाला धक्के देतच असते. असाच धक्का आता मोदी सरकारने दोन हजार रुपयांची नोट मागे घेण्याचा निर्णय घेऊन नागरिकांना पुन्हा त्याची पुनरावृत्ती घडविली आहे. फरक इतकाच आहे की, त्यावेळी नोटा बदलून घेण्यासाठी रांगेतच अनेक लोकांनी प्राण सोडले होते. आता त्यासाठी तीन महिन्यांचा अवधी दिल्याने बँकांमध्ये तुरळक गर्दी दिसते. मुळातच पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा रद्द करण्याची गरजच नव्हती. परंतु विरोधी पक्षांकडे असलेला काळा पैसा राजकारणात वापरला जाऊ नये, या राजकीय हेतूने देशातील १३० कोटी जनतेला अंधारात ठेवून मोदी सरकारने नोटाबंदीचा निर्णय घेतला. त्याचे प्रतिकूल परिणाम सामान्य जनतेवर काय होतील, याची थोडीशी कल्पनाही त्यावेळी सरकारने केली नाही. वाढत्या महागाईमुळे रुपयाचे मूल्य घटत असताना पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटांना तितके मूल्य नव्हतेच. दहशतवादी कारवायांसाठी वापरली जाणारी रसद तोडण्यासाठी नोटाबंदी केल्याचे कारण सरकारकडून पुढे केले जात असले तरी त्यामध्ये विरोधकांच्या खच्चीकरणाचाही डाव सरकारने रचला होता, हे स्पष्ट होते. पाचशे आणि हजाराच्या नोटा चलनातून काढून टाकल्यानंतर किती काळा पैसा बाहेर आला याची माहिती देशाला मिळण्याची गरज होती. परंतु मूळ उद्देश्य फसल्याने सरकार लोकांना काय माहिती देणार? रद्द केलेल्या नोटांना पर्याय म्हणून केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेला दोन हजार रुपयांच्या नोटांची छपाई करण्याचे आदेश दिले. त्यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला. कर रुपाने जमा होणाऱ्या जनतेच्या पैशाचा हा अपव्ययच होता. चलनात दोन हजारांची नोट आणल्यानंतर जनतेची आणखी कोंडी झाली. ती सोडवण्यासाठी पुन्हा पाचशे रुपयांच्या नोटा चलनात आणणे सरकारला भाग पडले. त्यानंतर दोन हजारांची गुलाबी नोट धनिक आणि भ्रष्ट राजकीय लोकांची संपत्ती बनली. प्राप्तिकर विभागाने अनेक ठिकाणी घातलेल्या धाडीमध्ये दोन हजार रुपयांच्या नोटांचे खोके सापडलेले देशाने पाहिले आहे. आताही दोन हजार रुपयांची नोट चलनातून मागे घेण्याची गरज काय होती? चलनातून बाद करायचे होते तर हा सगळा खटाटोप कशासाठी केला, असा प्रश्न उपस्थित होतो. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी पाच व दहा हजार रुपयांच्या नोटा चलनात आणायची शिफारस केंद्र सरकारला केली होती. मोठ्या व्यवहारांमध्ये या नोटांची गरज होती. राजन हे अभ्यासू अर्थतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी केंद्र सरकारची नोटाबंदी कशी फसली यावरही कोरडे ओढले होते. येत्या काही महिन्यात लोकसभेच्या निवडणुका लागणार असून प्रचारामध्ये विरोधी पक्षांनी नोटाबंदी करून सरकारने काय साधले, यावर सरकारला जाब विचारला पाहिजे. नोटा रद्द करुन नव्या नोटांच्या छपाईवरील खर्च देशाला परवडणारा नाही.

पान १ वरुन

### राज्यात प्रत्येक कुटुंबाला हक्काचे ..

विस्तारित झाली असल्याने योजनेच्या ३७४ कोटी रूपयांच्या फरकाच्या निधीस (गॅप फंडिंग) मान्यता देण्यात येईल. समांतर जलवाहिनीमुळे पाण्याची गळती थांबणार आहे. तसेच पाण्याचे वितरणही व्यवस्थित होणार आहे. जिल्हा रुग्णालयास फर्निचरसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. हद्दवाढीच्या भागात चांगली कामे व्हावीत यासाठी प्रयत्नशील आहे. हुतात्मा स्मृती मंदिराच्या नूतनीकरणासाठी निधी दिला जाईल. सोलापूरमध्ये उद्योग वाढीसाठी उच्चस्तरीय समितीची बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये उद्योगांना कशा प्रकारच्या सोयी सुविधा देता येतील याचा निर्णय घेतला जाईल. विमानतळाबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. शहरात सुरू असलेली रस्त्यांची कामे दर्जेदार होण्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. निकृष्ट काम करणाऱ्यांवर कारवाई करावी. सोलापूर शहराच्या व जिल्ह्याच्या विकासासाठी शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या विकासाला शासन पाठबळ देईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील म्हणाले, सोलापूर शहराला ऐतिहासिक व अध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. महापालिका व सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनने विकसित केलेल्या प्रकल्पांमुळे पायाभूत सुविधांमध्ये वाढ झाली आहे, तसेच सोलापूरच्या विकासालाही चालना मिळाली आहे. जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय महामार्ग गेले असून सोलापूर शहराला व जिल्ह्याला गतिमान करण्यासाठी जास्तीत जास्त उद्योग व्यवसाय येणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान



महाराष्ट्र राज्य हे देशात जास्त धरणे व जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करून शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्याबरोबरच कृषि उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. ही बाब विचारात घेऊन शासनाने राज्यातील धरणांमधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी राज्यातील धरणांधील गाळ काढून तो शेतात पसरविण्यासाठी गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना राबविण्यात आली आहे.यंदा अल निनोमुळे पाऊस सरासरीपेक्षा कमी पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच महाराष्ट्रातील जलसाठ्यांमध्ये अजूनही अंदाजे ४४ कोटी घनमीटर गाळ आहे. संपूर्ण राज्यात आणि विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्हे आणि महत्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच या आधीच्या योजनेत शासनाकडून फक्त इंधन खर्च देण्यात येत होता. मशीन खर्च स्वयंसेवी संस्था तर गाळ पसरविण्यासाठीचा वाहतूक तसेच पसरविण्याचा खर्च शेतकरी स्वतः करीत होते. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेचे महत्व पाहता ती जोमाने राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे यावेळेस शासनाकडून यंत्रसामुग्री आणि इंधन दोन्हीचा खर्च देणे देण्यात येणार आहे. तसेच अल्प व अत्यल्पभूधारक शेतक-यांना सुध्दा या योजनेचा पुरेपुर लाभ घेता यावा करिता अशा शेतक-यांना अनुदान देण्यात येणार आहे

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरीता सनियंत्रण समित्या गठित करण्यात आल्या आहेत. राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरीय समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांमार्फत या कार्यक्रमांचे सनियंत्रण करण्यात येणार आहे.योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे जी.ओ. टॅगिंग, योजनेची संगणक प्रणालीवर माहिती संकलित करण्यात येईल. संनियंत्रण व मूल्यमापन या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाचे स्वतंत्रपणे त्रयस्थ यंत्रणेमार्फत मूल्यमापन करण्यात येणार आहे. केवळ गाळ उपसा करण्यास परवानगी राहणार असून वाळू उत्खननास पूर्णतः बंदी असणार आहे. गाळ साचलेल्या धरणालगत किंवा तलावालगत क्षेत्रातील शेतकरी अथवा अशासकीय संस्था गाळ स्वखर्चाने काढून त्यांच्या शेतात वाहून नेण्याची कार्यवाही करणार असल्याची सूचना संबंधित यंत्रणेला करतील.

यासाठी इतर कुठलीही परवानगी लागणार नाही. गाळ उत्खनन करतेवेळी शेतकरी किंवा अशासकीय संस्थेकडून गाळाव्यतिरिक्त मुरुम किंवा वाळूचे उत्खनन होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. वाहून नेण्यात येणारा गाळ संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात वापरणे बंधनकारक असून अशा गौण खनिजाची विक्री किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही. ख-या अर्थाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान हा उपक्रम शेतक-यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. शेतीचा पोत सुधारण्यासाठी हा उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरून शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. **-जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर**

प्रास्ताविकात प्रभारी जिल्हाधिकारी श्री. ठोंबरे म्हणाले, नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बांधकामासाठी बारा कोटी रुपये खर्च आला असून या इमारतीत १९ शाखांचे स्थलांतर होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना कमीत कमी वेळेत चांगली सेवा देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी कळ दाबून डिजीटल पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन, इंदिरा गांधी स्टेडियम नूतनीकरण, मरीआई चौक येथील एक्झिबीशन सेंटर, इंद्र भवन, राणी लक्ष्मीबाई इमारतीचे लोकार्पण करण्यात आले व शासन आपल्या दारी योजनेंतर्गत शासनाच्या विविध योजनांचा पात्र लाभार्थ्यांना, उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभ देण्यात आला.

### राज्याचा बारावीचा निकाल ..

परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना अर्धा तास अतिरिक्त, कमी केलेला अभ्यासक्रम अशा सवलती देण्यात आल्या होत्या. त्यामुळे २०२१च्या तुलनेत गेल्या वर्षी २०२२मध्ये निकाल घटला. यंदा शंभर टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा, गैरप्रकार रोखण्यासाठी काटेकोर नियोजन आदी उपाययोजना करण्यात आल्या. परिणामी गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षीच्या निकालात २.९७ टक्क्यांनी घट झाली.

कोरोना प्रादुर्भावापूर्वी २०२०मध्ये नियमित पद्धतीने परीक्षा झाली होती. त्या परीक्षेचा निकाल ९०.६६ टक्के निकाल लागला होता. त्यामुळे २०२०च्या परीक्षेशी तुलना करता यंदाचा निकाल ०.६९ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून येते. दरवर्षीप्रमाणेच यंदाही मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ४.५९ टक्क्यांनी अधिक आहे. यंदा एकूण निकाल घटण्याबरोबर गुणवंतांची संख्याही घटली आहे. गेल्या वर्षी राज्यातील १० हजार ३७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले होते, तर यंदा राज्यातील ७ हजार ६९६ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले. त्यामुळे ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी गेल्या वर्षीच्या तुलनेत २ हजार ३५१ने कमी झाले आहेत.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर आदी या वेळी उपस्थित होते. यंदा परीक्षा चांगल्या वातावरणात पार पडली. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना वेळ मिळण्यासाठी वेळापत्रकात एका दिवसाचा खंड ठेवण्यात आला होता. ३८३ समुपदेशकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवल्या, त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले. कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबवण्यात आले. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, विविध विभागांनी सहकार्य केले. २७१ भरारी पथके कार्यरत होती. गैरप्रकारांबाबत एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले, असे गोसावी यांनी सांगितले.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार, दहावी-बारावीच्या परीक्षा होणार नसल्याचा गैरसमज समाजमाध्यमातून पसरला आहे. याबाबत राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी गुरुवारी स्पष्टीकरण देत पुढील वर्षीही दहावी आणि बारावीच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनेच होणार असल्याचे सांगितले.

शाखानिहाय निकाल
कला - ८४.०५ टक्के
विज्ञान - ९६.९ टक्के
वाणिज्य - ९०.४२ टक्के
व्यवसाय अभ्यासक्रम - ९१.२५ टक्के आयटीआय - ९०.८४ टक्के
विभागीय मंडळनिहाय निकाल
कोकण - ९६.१ टक्के
पुणे : ९३.३४ टक्के
नागपूर - ९०.३५ टक्के
औरंगाबाद - ९१.८५ टक्के
मुंबई - ८८.१३ टक्के
कोल्हापूर - ९३.२८ टक्के
अमरावती - ९२.७५ टक्के
नाशिक - ९१.६६ टक्के
लातूर - ९०.३७ टक्के

### राज्यसभेत अध्यादेशाविरोधात

शरद पवार यांच्यासह अजित पवार, सुप्रिया सुळे, प्रफुल पटेल, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील आदी नेते उपस्थित होते.

शरद पवार आणि अरविंद केजरीवाल यांनी संयुक्तपणे पत्रकार परिषदेला संबोधित केले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी म्हटले की, दिल्लीच्या लोकांवर अन्याय सुरू झाला आहे. केंद्र सरकारकडून दिल्ली सरकारच्या अधिकारांवर हल्ला करण्यात येत आहे. एका अध्यादेशाद्वारे केंद्राकडून अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार हिरावले. राज्यसभेत आम्ही विधेयक मंजूर होऊ देणार नाही. हा फक्त दिल्लीचा मुद्दा नाही, तर संघराज्याचा मुद्दा असल्याचे केजरीवाल यांनी म्हटले. भाजप विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यासोबत दुजाभाव करत आहे. ईडी आणि तपास यंत्रणांची भीती दाखवली जाते. अटक केली जाते. त्यालादेखील एखादा पक्ष जुमानला नाही तर आमदार फोडले जातात आणि भाजप सरकार स्थापन करते. महाराष्ट्रात हेच दिसून आले असल्याचे केजरीवाल यांनी सांगितले. त्यानंतरही राज्य सरकार झुकले नाही तर अध्यादेश काढले जातात. दिल्लीचा मुद्दा नाही तर सगळ्या देशाचा मुद्दा आहे. शरद पवार हे देशातील उत्तुंग नेते आहेत. त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी म्हटले. राज्यसभेत या अध्यादेशाबाबतचे विधेयक नामंजूर झाल्यास २०२४ चे चित्र दिसून येईल, असेही केजरीवाल यांनी म्हटले. आपला देश मोठी लोकशाही असलेला देश आहे. पण देशात लोकशाहीला मूल्य पायदळी तुडवले जात असल्याची टीका भगवंत मान यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अरविंद केजरीवाल यांना पाठिंबा दिला. देशात सध्या भाजपकडून लोकशाहीवर आघात सुरु आहेत. ही समस्या फक्त दिल्लीची नाही तर संपूर्ण देशाची आहे. त्यामुळे आम्ही केजरीवाल यांच्या पाठीशी आहोत असे पवार यांनी म्हटले. देशात सध्या भाजपकडून लोकशाहीवर आघात सुरू असल्याचे पवार यांनी म्हटले.

### गजानन महाराजांच्या पालखीचं

आहे. सुमारे ३० दिवसांत, तब्बल साडेपाचशे किलोमीटरची वाट तुडवत विठ्ठलभक्त गजानन महाराजांच्या सोबतीने पंढरपूरकडे निघणार आहेत. २७ जून रोजी ही पालखी पंढरपुरात पोहोचेल आणि आषाढीला गजानन महाराज विठ्ठलाची गळाभेट घेतील. शेगावातून प्रस्थान ठेवणाऱ्या संत गजानन महाराजांच्या पालखी मार्गावरील वाहतुकीत देखील बदल करण्यात आला आहे. पालखी मार्गावर दरवर्षी भाविकांची अलोट गर्दी होते, हे लक्षात घेता चोख पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला आहे. गर्दी अधिक वाढली तर गरज पडल्यास पालखीच्या मार्गाबाबत पोलीस प्रशासन निर्णय घेऊ शकते.

आषाढी वारीसाठी दरवर्षी महाराष्ट्रातून ४३ पालख्या पंढरपुरात दाखल होतात. या पालख्यांमध्ये तुकोबारायांची पालखी, माऊलींची पालखी, गजानन महाराजांची पालखी, सोपानकाकांची पालखी, मुक्ताईची पालखी या पालख्या आकर्षणाच्या केंद्रबिंदू ठरतात.

ज्ञानोबांची पालखी ११ जूनला ठेवणार प्रस्थान

माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकरी आळंदीत अनेक दिंड्या घेऊन दाखल होतात. श्रींची पालखी १२ जूनला गांधी वाड्यात दाखल होणार आहे आणि त्यानंतर ज्ञानोबांची पालखी मार्गस्थ होणार आहे.

तुकोबांची पालखी १० जूनला ठेवणार प्रस्थान

संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून १० जूनला पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. तर, २८ जून रोजी संत तुकोबारायांची पालखी पंढरीत दाखल होणार आहे. यंदा तुकोबांच्या पालखी सोहळ्याचे ३३८ वे वर्ष आहे.

### महिला वारकऱ्यांना मूलभूत,

वारकरी, भाविक व नागरिकांच्या सुविधेला प्राधान्य दिले जात आहे. पालखी मार्गावरील बंदोबस्त तसेच वाहतूक याबाबत सूक्ष्म नियोजन करण्यात येणार असून यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे. राज्य शासनाने आषाढी यात्रा कालावधीत जादा एस.टी. बसेस सोडण्याचे नियोजन केले असून यात्रेत महिला भाविक मोठ्या प्रमाणात येण्याची शक्यता लक्षात घेवून महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. तसेच शहरात १६२ सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. आषाढी वारी सोहळा निर्विघ्नरित्या पार पाडण्यासाठी वारकरी, भाविकांनी तसेच नागरिकांनी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्ग, पालखी मुक्काम, रिंगण सोहळा या ठिकाणी नगरपालिका, आरोग्य विभाग, मंदिर समिती, बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, ग्रामपंचायत विभाग, महावितरण आदि विभागांनी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली . तसेच बैठकीत विश्वस्त, फडकरी, दिंडीकरी, व्यापारी व नागरिकांनी सूचना मांडल्या. या सूचनांबाबत तात्काळ संबंधित विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश श्री. स्वामी यांनी दिले.

## शासकीय विभागीय ग्रंथालयाची वास्तू सांस्कृतिक विकासाचे केंद्र व्हावे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

रत्नागिरी : शासकीय विभागीय ग्रंथालयाची वास्तू हा ऐतिहासिक ठेवा आहे. ही वास्तू राज्याच्या सांस्कृतिक विकासाचे केंद्र व्हावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मरणार्थ कोकण वासियांकरिता राज्य शासनाद्वारे २० ऑक्टोबर १९७६ रोजी सुरु करण्यात आलेल्या या जुन्या शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या इमारतीचे नुतनीकरण, सुशोभिकरण व आधुनिकीकरण करण्यात आले. या वास्तुचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत पालकमंत्री उदय सामंत, कृषी मंत्री दादाजी भुसे, आमदार रविंद्र फाटक आदि उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, रत्नागिरी ही ऐतिहासिक वारसा असलेली भूमी आहे. या भूमीने विनायक दामोदर सावरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक अशी नररत्ने दिली आहेत. देशाच्या स्वातंत्र्यात या वीरांचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे. शासनाचे कोकणच्या विकासाकडे बारकाईने लक्ष असून कोकणच्या विकासाकरिता शासन कटिबद्ध आहे.सुमारे साडेचार कोटी रुपये



खर्च करुन बांधण्यात आलेल्या या वास्तूमध्ये सुमारे १ लाख १४ हजार इतकी ग्रंथसंपदा असून याचा ५० हून अधिक संशोधक अभ्यासक लाभ घेत आहेत. लोकमान्य टिळक स्मृतीशताब्दी निमित्ताने पालकमंत्री उदय सामंत यांनी या वास्तूसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सुमारे ५ कोटी रुपये उपलब्ध करून दिले. या ग्रंथालयामुळे शहरवासियांची वाचन संस्कृती जोपासण्यास मदत होईल तसेच विपुल ग्रंथ संपदेमुळे याचा संदर्भ ग्रंथालय म्हणूनही उपयोग होईल.

## नवीन संकल्पना अंमलात आणून यावर्षीचा गणेशोत्सव साजरा करावा : सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई : यावर्षी साजरा करण्यात येणारा गणेशोत्सव हा नवीन संकल्पना अंमलात आणून साजरा करावयाचा आहे. लोकमान्य टिळक यांनी जो हेतू समोर ठेवून गणेशोत्सव सुरू केला, त्या हेतूची जनजागृती करणारा गणेशोत्सव असावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज केले.सह्याद्री अतिथीगृह येथे मुंबई गणेशोत्सव पूर्व तयारी बाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी मंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. बैठकीला आमदार आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, उपसचिव विद्या वाघमारे, मुंबई महानगर पालिकेचे उपयुक्त रमाकांत बिरादार, मुंबई शहर अपर जिल्हाधिकारी रवी कट्टकधोंड, आदी उपस्थित होते. मंत्री श्री. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, सांस्कृतिक कार्य विभागाकडून यावर्षीही गणेशोत्सवात स्पर्धा घेण्यात येतील. यावर्षी साजरा करण्यात येणाऱ्या गणेशोत्सवाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी बैठक घेतलेली आहे. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार चार फुटाच्या आतील गणपती मूर्ती मातीच्या व चार फुटावरील मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा मातीच्या बनविण्यात याव्यात. त्याबाबत न्यायालयाने दिलेले निर्देश पाळावेत. याबाबत मूर्तीकार बांधवांची पर्यावरण विभागासोबत बैठक घेण्यात येईल. महापालिकेने मूर्ती बनविणे, मूर्तींचे विसर्जन, मूर्तीकारांना देण्यात येणारी जागा याबाबत सुलभ कार्यप्रणाली तयार करावी. ध्वनी क्षेपकाव्यतिरिक्त रात्री १० वाजेनंतर मंडपात करण्यात येणाऱ्या गणपती आरत्यांना परवानगी बाबत सर्वांनी एकत्र येऊन निर्णय घ्यावा. या प्रकरणात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. गणपती विसर्जन मिरवणूकांमध्ये कुठेही अनुचित प्रकार घडू नये, याबाबत पोलीस विभागाने दक्ष असावे. त्यासाठी कडक बंदोबस्त ठेवावा. महानगरपालिकेने गणेशोत्सवासाठी विविध परवानग्या देण्यासाठी 'एक खिडकी योजने'ची अंमलबजावणी करावी, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांनी यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन व लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे करण्यात आले. महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी नूतन इमारतीच्या मध्यभागी उभारण्यात आलेल्या संविधान कोनशिलेचे अनावरण उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास खासदार सर्वश्री डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजीतसिंह मोहिते - पाटील, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, बबनराव शिंदे, शहाजी पाटील, राम सातपुते




उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी जिल्हा प्रशासनास शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

या इमारतीची उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पाहणी केली व उपलब्ध सोयी सुविधांची माहिति घेतली. प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी इमारतीची व त्यातील सोयी-सुविधांची माहिति दिली. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार आदि उपस्थित होते.

प्रशस्त व सुसज्ज इमारत ही देखणी इमारत प्रशस्त व सर्व सोयींनी सुसज्ज आहे. इमारतीच्या बांधकामासाठी जवळपास १२ कोटी रूपये खर्च आला आहे. मुख्य इमारत जवळपास ७७२८ चौ. मी. आहे. यामध्ये पार्किंगव्यतिरीक्त दोन मजले आहेत. बाह्य व अंतर्गत पाणीपुरवठा, जलनिःस्सारण, विद्युतीकरण, संगणकीकरण ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या इमारतीत जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत १९ शाखा स्थलांतरीत होणार आहेत. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. अभ्यागतांची, सर्वसामान्य नागरिकांचीही सोय होणार आहे. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाची जुनी इमारत १९८६ मध्ये त्यावेळच्या गरजेनुरूप बांधण्यात आली होती. आता ३६ वर्षानंतर ही इमारत अपुरी पडत होती. पार्श्वभूमिवर जिल्हाधिकारी कार्यालयास नवीन इमारत आणि नवीन चेहरा प्राप्त झाला आहे.

## जगद्गुरू पंचाचार्य उच्च माध्यमिक प्रशालेचा निकाल शंभर टक्के



कुमारी सानिया सय्यद ८२.३३%, | कुमारी प्रतीक्षा माळी ८०.५०% | कुमार अजय चव्हाण ७८.५०%

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेच्या उच्च माध्यमिक,( बारावी) परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.कुमारी सानिया सय्यद ८२.३३%, गुण मिळवून प्रशालेत प्रथम मिळविल्या कुमारी प्रतीक्षा माळी ८०.५०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक. तर कुमार अजय चव्हाण ७८.५०% तृतीय क्रमांक गुण मिळवून यश संपादन केले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त शिवाचार्य रत्न श्री.ष.ब्र.डॉ.जय सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी गटशिक्षणाधिकारी शेख, विस्तार अधिकारी भीमाशंकर वाले.संस्था प्रतिनिधी योगीराज हिरेमठ. व संस्थेचे सर्व पदाधिकारी,केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके, प्राचार्य कल्याणी देशेट्टी,पर्यवेक्षक नारायण मोरे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.

## पी.बी.पाटील यांचे निधन



पंढरपूर : संत दामाजी कारखान्याचे विद्यमान संचालक व मंगळवेढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रकाश भिवाजी पाटील उर्फ पी बी पाटील सर यांचे अपघातात उपचारादरम्यान आज निधन झालेबुधवारी पहाटे पुण्याजवळ झालेल्या भीषण अपघात झाला होता उपचारादरम्यान निधन झाले असून पुणे इथून त्यांचे पार्थिव आज रात्री उशिरापर्यंत पंढरपूरमध्ये पोहोचेल बुधवारी पहाटे पुण्याजवळ झालेल्या भीषण अपघात झाला होता उपचारादरम्यान निधन झाले असून पुणे इथून त्यांचे पार्थिव आज रात्री उशिरापर्यंत पंढरपूर मध्ये पोहोचेल उद्या सकाळी सात वाजता पंढरपूर येथील त्यांच्या मनीष नगर येथील राहत्या निवासस्थानी अंत दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून त्यानंतर त्यांचे मूळ गावी मारापुर येथे सकाळी आठ च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत

## 'कर्मवीर महाविद्यालयाचे एच. एस.सी. बोर्ड परीक्षेत उज्वल यश'

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा बोर्ड परीक्षेचा ऑनलाईन निकाल दि. २५ मे २०२३ रोजी प्राप्त झाला. विद्याशाखानिहाय शेकडा निकाल व पहिले तीन क्रमांक खालील प्रमाणे. विज्ञान शे. निकाल - ९९.७३ टक्के प्रथम क्रमांक - सवाळकर यश शीतलकुमार व्दितीय क्रमांक - कु उत्पात श्रध्दा रामचंद्र तृतीय क्रमांक कु.खडके सुहानी संजीवकुमार कला - शे. निकाल ९१.७० टक्के प्रथम क्रमांक - कु.सुर्यवंशी सोनाली संजय व्दितीय क्रमांक - कु.मुळे अमृता विजयकुमार तृतीय क्रमांक - कु. आप्रे आकांक्षा गौरखनाथ वाणिज्य - शे. निकाल - ९९.४६ टक्के प्रथम क्रमांक - अयाचित अमेय जयंत व्दितीय क्रमांक कु. कोहळे सायली रविंद्र तृतीय क्रमांक कु. रोंगे निलम सुरेश तृतीय क्रमांक कु.सुर्यवंशी रिध्दी दत्तात्रय एच. एस. सी. व्होकेशनल - शे. निकाल प्रथम क्रमांक - व्दितीय क्रमांक तृतीय क्रमांक कु.सगर जोहिता राजेंद्र कु.सगर नेहा विजय कु. मिसाळ कल्याणी संजय - ९८.११ टक्के इ. १२ वी वाणिज्य इेज्ञ घशशळिपस Accountancy या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त करणारे ५ विद्यार्थी - अंबुरे साईनाथ अभय, अयाचित अमेय जयंत, हराळे प्रणव प्रदिप, कु. नलवडे तन्वी संजय, कु.पाटील गायत्री ऋषिकेश यशस्वी विद्यार्थ्यांचे मा. प्राचार्य डॉ. खिलारे सी.जे. यांनी हार्दिक अभिनंदन केले व त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री. उप्राचार्य प्रा. शिंदे बी.आर., पर्यवेक्षक प्रा. आवताडे यु.डी., प्रा. मुसळे आर.एस. श्री. भोसले व्ही.एम. श्री. प्रभाकर पारधी, श्री शिवाजी लोभे , सर्व प्राध्यापक व कार्यालयीन सेवक उपस्थित होते.

# आषाढी वारी नियोजनाबाबत आयोजित बैठकीत 'या' प्रश्नांवर चर्चा झालीय का?

## राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांना बोलावणे जाणुनबुजून टाळले : गणेश अंकुशराव

पंढरपुर/प्रतिनिधीः आषाढी वारी नियोजनाबाबत पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सभागृहात नुकतीच एक बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी पंढरपूर शहरातील विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांना बोलावणे टाळले गेले. दरवर्षी आषाढी वारी च्या नियोजनासंदर्भातील महत्वपुर्ण बैठक ही तुकाराम भवन मध्ये घेतली जाते, या बैठकीसाठी प्रशासकीय अधिकारी, वारकरी, समाजसेवक, पत्रकार, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आदींसह पालकमंत्री, आमदार, खासदार यांना आमंत्रित केले जाते, परंतु या वर्षी पार पडलेली बैठक ही कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली, या बैठकीला पालकमंत्री, आमदार, खासदारांची मंदिर समिती सहअध्यक्ष यांची अनुपस्थिती होती, सामाजिक संघटना राजकीय पक्षांना बैठकीला बोलावले नाही. यामागचे नेमके कारण काय?




हा प्रश्न उपस्थित होत असून आम्हाला पंढरपूरमध्ये वारीकाळात पंढरपूरकरांसह वारकर्यांच्या असुविधांबद्दल चर्चा करायची होती. ते राहून गेले. अशी खंत महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे व्यक्त केली आहे. त्याचबरोबर वारीकाळातील नेहमीचे कांही महत्वाचे उपस्थित होणारे प्रश्न व वारकर्यांच्या असुविधांचा पाढा त्यांनी या प्रसिध्दीपत्रकात नमुद केलाय. वास्तवीक पहाता पंढरपूर मधील चंद्रभागा वाळवंट परिसर, आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे उपजिल्हा रुग्णालय (सामान्य रुग्णालय) आदी ठिकाणी वारकर्यांच विविध प्रश्नांना सोडविण्यासाठी मी व माझ्या संघटनेचे कार्यकर्ते अहोरात्र झटत असतो. ही बाब येथील प्रशासकीय अधिकार्यांसह राजकीय नेतेमंडळींनाही माहित आहे. परंतु आम्हालाच या बैठकीला बोलावणे का टाळले? असा सवालही गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे.

आषाढी वारीआधी खालील प्रश्न सोडविणे अत्यावश्यक आहे.चंद्रभागेतील वाळु उपशामुळे पडलेल्या खड्ड्यात भाविकांचे बळी जाऊ नये म्हणून हे खड्डे त्वरीत बुजवणे आवश्यक आहे. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची व स्टाफची रिक्त पदे त्वरीत भरणे अत्यावश्यक आहे. पंढरपूर शहरातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था आहे. तसेच मंदिर समितीचे सदस्य दररोज दर्शनासाठी शेकडो लोकांना वशिल्याने सोडतात याच्यावर अंकुश असणे आवश्यक आहे, महिलांसाठी व पुरुषांसाठी मुतार्यांचा अभाव आहे, यात्रा कालावधीमध्ये स्थानिक लहान मोठ्या व्यावसायिकांना अतिक्रमणाच्या नावाखाली त्रास दिला जातो परंतु; ऐन एकादशी दिवशी बाहेरचे व्यावसायिक येऊन येथे लाखोंचा व्यवसाय करतात त्याचे काय? डुप्लीकेट करवसुलीच्या पावत्या यात्रा कालावधीत छापल्या जातात, दर्शनबारीमध्ये पाऊस आल्यावर गळती असल्याने भाविकांचे हाल होतात, सुरक्षेचा अभाव असल्याने अनेकदा दर्शनबारीत घुसखोरी होते, अन्न व प्रशासनाने बाहेरगावाहून आलेल्या व्यावसायिकांच्या खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानांची तपासणी केली पाहिजे, हे लोक निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ विकतात व याचा विपरीत परिणाम वारकर्यांच्या आरोग्यावर होऊन नाहक पंढरपूरची बदनामी होते. सध्याच्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्यांचा कार्यकाल संपल्याने नियमानुसार ही समिती आषाढी वारीच्या आधीच बरखास्त व्हायला हवी. नवीन मंदिर समितीमध्ये पुन्हा जुने सदस्य घेऊ नये कारण हे काय कुठले ताम्रपट घेऊन आलेले नाहीत. पंढरपूर शहरातील अनेक ड्रेनेजचे चेंबर फुटल्याने येथे अपघाताची शक्यता डावलता येत नाही. एमएसईबीच्या भुमीगत वायरींगच्या डेपोंचीही तपासणी करुन आवश्यक तेथे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ६५ एकर परिसरात वारकर्यांना अनेक असुविधांना तोंड द्यावे लागते. प्रशासकीय अधिकार्यांनी कागदावर दाखवलेल्या सुविधा या फक्त कागदावरच असतात, वास्तविकत: अनेक सुविधा पुरवल्याच जात नाहीत हा आमचा आजपर्यंतचा अनुभव आहे. यात्रा काळात आषाढी वारीसाठी प्रशासनाकडून टेंडर देऊन ठेकेदारांमार्फत जी कामे घाईघाईने करुन घेते ही सर्व कामे निकृष्ट दर्जाची होतात. याची चौकशी कधी झालीय का?असे अनेक प्रश्न गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केले असून यावर्षीच्या आषाढी वारीकाळात आम्ही व आमचे कार्यकर्ते वरील सर्व बाबींवर बारीक लक्ष ठेवून असू व प्रशासनाचा गलथान कारभार चव्हाट्यावर आणू. असा इशाराही गणेश अंकुशराव यांनी दिले

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महिला सन्मान पुरस्कार

कळंब/दै.यशसिद्धी न्यूज : उस्मानाबाद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी दिनांक ३१ मे रोजी प्रत्येक ग्रामपंचायत गट ग्रामपंचायत क्षेत्रातील महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत शासन निर्णयान्वये निर्देश प्राप्त झालेले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर दिनांक २७ मे २०२३ सायंकाळी ५ वाजेपर्यंत इच्छुक महिलांचे अर्ज स्वीकारावेत प्राप्त अर्जाची दररोज गुगल सीट मध्ये संबंधित पर्यवेक्षिका व विस्तार अधिकारी ( सा) यांनी नोंदणी करावी. दिनांक २८ मे २०२३ रोजी गाव स्तरीय समितीची बैठक आयोजित करून गुणवत्तेनुसार दोन महिलांची निवड करून त्यांची नावे ग्रामपंचायत बोर्डावर प्रसिद्ध करावेत. निवड समितीचे इतिवृत्त ठेवावे निवडी संदर्भात तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी दि. २९ मे २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत यापूर्वी दिलेल्या विहित नमुन्यात प्रमाणपत्र व समान चिन्ह तयार करून त्यावर नावे लिहावीत. प्रमाणपत्राचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी निवड झालेल्या महिलांना ग्रामसेवकांनी दि. ३० मे २०२३ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत




निवडीचे पत्र द्यावे दि. ३१ मे २०२३ रोजी पुरस्कार समारंभाचे आयोजन करून पुरस्कारांचे वितरण करावे आणि त्याची व्यापक स्वरूपात स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध देण्यात यावी.

सन्मानपत्र सन्मानचिन्ह शाल व श्रीफळ, आणि रोख रक्कम (५००रुपये प्रति महिला) असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या महिला, महिला या त्याच ग्रामपंचायती किंवा गट ग्रामपंचायत येथील रहिवासी असावी, त्यांचे कार्य हे त्याच ग्रामपंचायती किंवा गट ग्रामपंचायत मध्ये केलेले असावे, महिला व बाल विकास क्षेत्रात किमान ३ वर्षे कार्य केलेले असावे, पुरस्कार प्राप्त महिला या सात वर्षानंतर या पुरस्कारासाठी पुन्हा पात्र ठरतील, महिलांच्या समस्या व प्रश्नाबाबत जाणीव व संवेदनशीलता असावी, सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग असावा, महिला अत्याचारांमध्ये समाविष्ट नसावी,

बालविवाह प्रतिबंध, हुंडा निर्मूलन, लिंग चिकित्सा प्रतिबंध, घरगुती हिंसा प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, महिला स्वयंसहायता बचत गट, आरोग्य साक्षरता, मुलींच्या शिक्षणासाठी पुढाकार यासारख्या कार्यामध्ये उत्स्फूर्तपणे पुढाकार घेतलेला असावा, इच्छुक महिलेने स्वतःची वैयक्तिक माहिती व केलेल्या कार्याच्या तपशीला सह संबंधित ग्रामपंचायतकडे दिनांक २७ मे २०२३ पर्यंत अर्ज सादर करावा, ग्रामपंचायत स्तरावर दोन कर्तबगार महिलांची निवड करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसेवक, पोलीस पाटील, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, आणि आशा वर्कर, यांची समिती गठीत करावी,ज्या ग्रामपंचायत मध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी यांचा कार्यकाल समाप्त झालेला असेल किंवा ग्रामपंचायत बरखास्त झालेले असेल अशा ठिकाणी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून महिलांची निवड करण्यात येणार आहे. तरी याचा इच्छुक महिलांनी लाभ घ्यावा असे आव्हान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

## शब्दकोडे क्र ९



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

## पंढरपुरात २२ पान टपऱ्यावर कोटपा कायद्यांतर्गत कारवाया

### चार हजार दोनशे रुपयांचा दंड वसूल

पंढरपूर /प्रतिनिधी : ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून पंढरपुरात २२ पान टपऱ्यावर कारवाया करून चार हजार दोनशे रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय अंमलबजावणी पथकाने पंढरपुरात विविध ठिकाणी धाडी टाकून दंडात्मक कारवाया केल्या. तंबाखू नियंत्रण कायदा कोटपा २००३ अंतर्गत ४ व ६ कलमांतर्गत या कारवाया करण्यात आल्या असून पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, जुना कराड नाका, पंचायत समिती, पंढरपूर बस स्टँड परिसरातील पानटपऱ्यावर कारवाई केली.

सदर कारवाई जिल्हा शल्य चिकित्सक डॉ धनंजय पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत भागवत, तंबाखू नियंत्रण




कक्षाचे अमित महाडिक, श्रीमती मंजुश्री मुळे,पोलीस कॉन्स्टेबल श्री.कांबळे, पोलीस हवालदार श्री.गोडसे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या विश्रामधामची अवस्था कबाडखान्या सारखी



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असलेल्या विश्राम धामची अवस्था ही कबाडखान्याची झाली आहे. सदरील बांधकाम होवून ३५ वर्षे झाली. अद्यापही नव्याने विश्रामधाम नाही. हाती घेतलेले बांधकाम गेल्या वर्षभरापासून अर्धवट स्थितीत असल्याने बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत तीव्र तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.


राज्यातील टॉप फाईव्हमधील अक्कलकोट तीर्थक्षेत्र असताना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित तालुका हे पुसून काढण्याकामी आमदार सचिन कल्याणशेट्टी हे विविध माध्यमातून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनचा बॅकलॉग भरुन काढणेकामी शासनाच्या विविध योजना आणून त्या राबविणेकामी प्राधान्य दिले जात आहे. त्यांच्या या आमदारकीच्या काळात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील जनतेला अच्छे दिन बघण्याचा योग येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग हे अक्कलकोट तालुक्याकरिता चोहोबाजुच्या राष्ट्रीय महामार्गामुळे या विभागाचे स्थान नगण्य ठरत असल्याने तेथील अधिकारी व कर्मचारी आयाराम-गयाराम अशी स्थिती निर्माण झालेली आहे. गेल्या ३५ वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे नव्याने विश्राम धाम होवू शकले नाही, ही खेदाची बाब आहे. स्वामी भक्तांचे राज्यासह परराज्य, परदेशातून येणार्या स्वामी भक्तांचा लोंढा वाढत चाललेला असताना सार्वजनिक बांधकाम विभागाची अवदासिन स्थिती बाबत भक्तांतून देखील राग व्यक्त होत आहे.

सदर विश्राम धाम बांधणार्या ठेकेदाराने २ कोटी १९ लाख ४५ हजार रुपयाचे काम घेतलेले आहे. सदर कामाला बी१/एसई/२७/२१-२२ दि.४ जानेवारी २०२२ रोजी ठेकेदार मे. तिरुपती कस्ट्रक्शन अभिजित गायकवाड (वैराग) यांनी हाती घेतलेला आहे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम यांची कार्यान्वित यंत्रणा असून दीड वर्षांपासून काम बंद असल्याचे चित्र आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी राज्यासह परराज्यातील काही उच्चस्पद अधिकारी, खंडपीठ, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना देखील विश्राम धामच्या अवस्थेबाबत ताशेरे ओढले आहेत. असे असताना देखील अद्यापही राज्याचे सार्वजनिक बांधकाम सचिव, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता आजमितीस बघ्याची भूमिका घेतल्याची स्पष्ट होत आहे. काही कर्मचारी वगळता सर्वच कर्मचारी सोलापूर येथे राहत असल्याने सकाळी येताच दुपारचा पत्ता नसतो अशी अवस्था या कार्यालयाची झालेली असून सरकार कोणाचे का असेना, आमचे मात्र बरे चालले आहे. या अर्विभावात असलेल्या अधिकारी व कर्मचार्यांबाबत विविध सामाजिक संघटनेकडून आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रिपाई अधिवेशनाचे निमंत्रण

सोलापूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय नेते तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.रामदासजी आठवले यांच्या आदेशानुसार आज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांचे सोलापूर विमानतळ येथे स्वागत करीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे शिर्डी येथे २८ मे रोजी होणाऱ्या महाअधिवेशन सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले. त्याच बरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून विद्यापीठातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, छत्रपती संभाजी महाराज या महापुरूषांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करण्याचा ठराव गेल्या ३ ते ४ वर्षापूर्वी मंजूर करण्यात आला होता त्यास अद्याप मंजुरी मिळाली नसून त्याची दखल घेवून त्यास आर्थिक तरतूद मंजुरी करून निधी विद्यापीठाकडे पाठवून द्यावा असे निवेदन दिले. प्रसंगी रिपाइंचे सोलापूर शहराचे समन्वय समितीचे अतुल नागटिळक,राजेश उबाळे,पवन थोरात,शाम धुरी,उपस्थित होते.



## सैनिक टाकळीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून विविध विकास कामासाठी मान्यता



सैनिक टाकळी/संजय चव्हाण : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील रामेश्वर मंदीर येथे नदीवर घाट बांधणे, ग्रामसचिवालय, बालोद्यान क्रीडांगणासाठी आणि गावातील विविध विकास कामासाठी मुख्यमंत्र्यांच्या कडून तत्त्वतः मान्यता देण्यात आली .यावेळी माजी मंत्री आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी विशेष प्रयत्न केले .यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख. सतीश मलमे ,उपतालुका प्रमुख ,संभाजी गोते .अशोक शिंगाडे ,सैनिक टाकळीचे माजी उपसरपंच संतोष गायकवाड, सुदर्शन भोसले धनाजी पाटील उपस्थित होते.

## एकरूख तलावातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ



सोलापूर/प्रतिनिधीः पाणी समस्येवर मात करण्यासाठी जलसंधारण महत्त्वाचे आहे. शासनाने वेगवेगळया अभियानाच्या माध्यमातून दुष्काळी तालुक्यातील तलाव, विहिरी, नद्या, पुनरुज्जीवित केल्या आहेत. गावे टँकरमुक्त केली आहेत. एकरूख तलाव हा ब्रिटिश काळातील तलाव गाळमुक्त केला तर साठणाऱ्या पाण्यातून हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येईल आणि जलसंधारणाच्या माध्यमातून परिसरातील गावे स्मृध्द होतील, असे मत प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी व्यक्त केले. बुधवारी, राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाच्यावतीने गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार अभियानाचा शुभारंभ उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील एकरूख तलाव येथे प्रभारी जिल्हाधिकारी ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यात १२२ ठिकाणी हे अभियान राबवले जाणार आहे. यासाठी १६ समाजिक संस्थांची नियुक्ती केली आहे. या संस्थांच्या माध्यमातून तलावातून गाळ काढून शेतकाऱ्यांना मोफत दिला जाणार आहे. माजी सैनिक, विधवा, अंध, दिव्यांग यांच्यासाठी वाहतुकीसह मोफत गाळ दिला जाणार आहे. ज्या सामजिक संस्थांना हे गाळ काढण्याचे काम दिले आहे, त्यांना ३५ घनमीटरप्रमाणे ३७ हजारांचे अनुदान दिले जाणार आहे. मागील २७ वर्षांपासून जलसंधारण व पाणलोट क्षेत्रात कार्यरत असलेल्या मार्डी येथील शिवराज बहुउद्देशीय संस्थेस या योजनेसाठी कार्यकारी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. संस्थेच्यावतीने जेसीबी, हायवा तयार ठेवल्या आहेत. परिसरातील २४ शेतकऱ्यांनी गाळा घेऊन जाण्यासाठी नोंदणी केली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अविनाश मार्तंडे यांनी दिली. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, कार्यकारी अभियंता पंडित भोसले, सहायक जलसंधारण अधिकारी होनमुटे, उपसरपंच काशीनाथ कदम, मंडलाधिकारी अविनाश गायकवाड, शिवराज संस्थेचे पथकप्रमुख संभाजी पाटील, स्थापत्य अभियंता विशाल मार्तंडे, सदस्य जयदत्त मार्तंडे, शेतकरी शंकर पाटील, भगवान कदम, पोपट भोसले, राजेंद्र साठे, संजय रजपूत, नागनाथ गुळवे उपस्थित होते. सूत्रसंचालन कमलाकर जाधव यांनी केले.

## लोकप्रतिनिधींच्या सहभागाने 'शासन आपल्या दारी' अभियान यशस्वी करा

# राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची गतीने अंमलबजावणी करावी

## आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश



सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची गांभीर्याने व गतीने अंमलबजावणी करावी. लोकप्रतिनिधींच्या सहभागाने 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देऊन अभियान यशस्वी करावे, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजीतसिंह मोहिते पाटील, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, बबनराव शिंदे, शहाजी पाटील, राम सातपुते, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे आदी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार अभियान २.०, मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व शहरी, जलजीवन मिशन, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, शासन आपल्या दारी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना या योजनांसह नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा व दिलेल्या मदतीचा आढावा घेतला.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'शासन आपल्या दारी' या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत दोन महिन्यात जनतेपर्यंत मोठ्या प्रमाणात त्यांच्यासाठीच्या योजना पोहोचवायच्या आहेत. या अभियानाबाबत लाभार्थींच्या प्रतिक्रिया समाधानकारक आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीत लोकप्रतिनिधींचा सहभाग घ्यावा व हे अभियान यशस्वीपणे राबवावे, असे त्यांनी सांगितले. प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी शासन आपल्या दारी योजनेचा आढावा सादर करताना या अभियानादरम्यान जिल्हा प्रशासनाने विविध विभागांच्या सहकार्याने दुप्पट म्हणजेच दीड लाख दाखलेवाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेची अंमलबजावणी** कृषि विजेचा सर्वाधिक वापर असणाऱ्या पहिल्या तीन जिल्ह्यात सोलापूरचा समावेश आहे. त्यामुळे मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना सोलापूर जिल्ह्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. या योजनेतून शेतीला दिवसा विनाव्यत्यय वीज देता येणार असून, याचा फायदा शेतकऱ्यांना समजावून सांगावा, असे सूचित करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.० या योजनेत स्वयंस्फूर्तीने सहभागी ग्रामपंचायतींना शासनाकडून प्रोत्साहन म्हणून प्रतिवर्ष ५ लाख प्रमाणे तीन वर्षात मिळून १५ लाखांचा निधी दिला जाणार आहे. सरकारी जमिनी उपलब्ध नसणाऱ्या गावात शेतकऱ्यांच्या पडीक जमिनी भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. या जमिनीला महावितरणमार्फत प्रति एकर, प्रतिवर्ष ५० हजार रुपये भाडे दिले जाणार असून, त्यामध्ये दरवर्षी ३ टक्के वाढ केली जाईल. याशिवाय यामुळे प्रदूषणही कमी होणार असल्याने मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेगाने कार्यवाही करावी. त्यासाठी लागणाऱ्या जमिनी ताब्यात घेण्याकरिता जुलैपर्यंत पहिल्या टप्प्याचे उद्दिष्ट पूर्ण करावे. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही ते म्हणाले. महावितरणचे अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांनी सादरीकरण केले. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महसूल प्रशासन, वन विभागाशी समन्वय ठेवून कामकाज करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**जलयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा** जलयुक्त शिवार योजनेचा आढावा घेतांना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, जलयुक्त शिवार योजना १ मधून जिल्ह्यात ३ लाख १७ हजार हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता तयार झाली आहे. सोलापूर हा परतीच्या पावसाचा, अवर्षणप्रवण जिल्हा आहे. त्यामुळे सिंचनाबाबतचे प्रश्न जलसंधारणातूनच सोडवले जातील. त्यासाठी जलयुक्त शिवार योजना २.०, अटल भूजल, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनांची विहित मुदतीत प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांनी सादरीकरण केले. उपलब्ध २२४ पैकी १६६ गावांच्या निवडीस तालुका समितीने शिफारस केल्याचे त्यांनी सांगितले.

**आवास योजनेचे उद्दिष्ट वाढवा** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व शहरी यांचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री म्हणाले, आवास योजनांतर्गत ज्यांच्याकडे जमिनी नाहीत, त्यांना जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व पर्यायांचा विचार करावा. आता मोदी आवास योजना सुरू करण्यात येत असून, या योजनेसह शबरी, रमाई, प्रधानमंत्री आवास योजना एकत्रित करून १० लाख घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यानेही चौपट उद्दिष्ट ठेवावे. सर्व स्तरातील विविध घटकांना न्याय देऊन पात्र गरजूंना लाभ देण्यासाठी मोहीम राबवावी, असे ते म्हणाले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व जिल्हा प्रशासन अधिकारी आशिष लोकरे यांनी सादरीकरण केले. जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत कामांना गती द्यावी, विहित वेळेत कामे पूर्ण करावीत व कामांच्या दर्जामध्ये कसलीही तडजोड करू नये, असेही निर्देश श्री. फडणवीस यांनी दिले. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद सुनील कटकधोंड यांनी जलजीवन मिशन अंतर्गत कामांची माहिती दिली तर कार्यकारी अभियंता श्री. परदेशी यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची माहिती दिली.

**आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत** उपमुख्यमंत्री म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील अवकाळी पाऊस, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना विविध योजनांतून आतापर्यंत ४७२ कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले असून, प्रधानमंत्री किसान योजनेप्रमाणेच 'नमो किसान योजना' सुरू करण्यात येणार आहे. गेल्या दोन महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे कोणतेही पैसे थकित ठेवणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी श्री. फडणवीस यांनी योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी जाणून घेतल्या.पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन नियोजन करावे. शासकीय योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. यावेळी लोकप्रतिनिधींनी योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मत मांडले. विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## अक्कलकोटचे डीवायएसपी राजेंद्रसिंह गौर यांची बदली



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांची पिंपरी चिंचवड येथे सहायक पोलीस आयुक्त म्हणून बदली झाली आहे. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांसाठी मंदिर समिती तसेच अन्नछत्र मंडळ यांच्यामार्फत योग्य नियोजन करण्यात यावे यासाठी गौर नेहमी तत्पर राहिले. भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी त्यांनी मंदिर समिती, अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट नगरपरिषद आणि तहसीलदार यांच्यासमवेत वारंवार नियोजन बैठका घेऊन उपाययोजना करण्यासाठी भाग पाडले. इतकेच नाही तर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी त्यांनी रुग्णवाहिका व वैद्यकीय सेवा तैनात करण्याची सक्ती मंदिर समिती व अन्नछत्र मंडळाला केली. याचे चांगले परिणाम दिसून आले. अक्कलकोट व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कायदा व सुव्यवस्था उत्तम ठेवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

## जयंत पाटील यांच्या ईडी चौकशीचा निषेध

माळशिरस/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सूडभावनेने ईडीने नोटीस देऊन चौकशीसाठी बोलाविल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने करण्यात आला असून त्यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारचा निषेध नोंदवत येथे पोलीस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले. बिगर भाजपशासित राज्यात आणि महाराष्ट्रात विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवून सत्तेचा गैरवापर करून व केंद्रीय यंत्रणेच्या दुरुपयोग विरोधी पक्षाची मुस्कटदाबी करण्यासाठी सत्ताधारी करत असल्याचा आरोप सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोकराव गायकवाड यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे. याप्रसंगी



प्रदेश सचिव तुकाराम साळुंखे पाटील, जिल्हाध्यक्ष धनंजय साठे, माळशिरस तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, अकलूज शहराध्यक्ष अभिषेक गायकवाड, किरण साठे, साजिदभाई सय्यद, जाकिर शेख, अविनाश सोनवणे,सयाजीराव गायकवाड उपस्थित होते.